PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chikat Navara
Year: 1994

Song: Themb Aale Chimb Oleti
Lyricist: Pravin Davane

थेंब आले चिंब ओलेती
झाली ही काया
ओढ जागे आग लागे
कशी ही फुलाया
सांग सजणा काही सुचेना
सांग सजणा काही सुचेना
काळजाचा ठोका
पावसाचा झोका
नाजूक मोका हा आलाय जुळून
थेंब आले नशा ओलेती
लागे भिनाया
कोण छेडे गीत ओठी हे
लागे जुळाया
सांगू कसं गं शब्दात मी
सांगू कसं गं शब्दात मी
वादळवारा मनात माझ्या
श्रावण प्रीतीचा आलाय फुलून

ही धुंदी नवी नजरबंदी नवी
नव्या स्पर्शाची जादू अनोखी
ही मस्ती नवी तू जवळी हवी
नव्या लाटेची भरती निराळी
या लाटेवरी नव्या वाटेवरी
आज आल्या सरी थेंब अंगावरी
करी स्पर्शात या .... जागे ऊरी
गंध मातीतला ताल हृदयी धरी

काळजाचा ठोका पावसाचा झोका
नाजूक मोका हा आलाय जुळून
थेंब आले चिंब ओलेती
झाली ही काया
कोण छेडे गीत ओठी हे
लागे जुळाया

तुझ्यासाठीच मी माझ्यासाठीच तू
वीज नभाशी तशी मला तू
तोल जाई असा जीव होई पिसा
तुझ्या बाहूंचा आधार दे तू
आज मेघातूनी सुख बरसे असे
मन मोरापरी चिंब झाले कसे
हा पिसारा फुले क्षण झेलू कसे
या हृदयातूनी ठेव जपूनी असे
काळजाचा ठोका पावसाचा झोका
नाजूक मोका हा आलाय जुळून
थेंब आले नशा ओलेती
लागे भिनाया
कोण छेडे गीत ओठी हे
लागे जुळाया
सांग सजणा काही सुचेना
सांग सजणा काही सुचेना
काळजाचा ठोका पावसाचा झोका
नाजूक मोका हा आलाय जुळून

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*